राज्य सेवा (मुख्य) परीक्षा- २०२३ परीक्षा दिनांक २० जानेवारी, २०२४.

# 2023

J18

संच क्र. **A**

| प्रश्नपुस्तिका क्रमांक BOOKLET NO. |
|---|
| 205405 |

## प्रश्नपुस्तिका – 2
## मराठी व इंग्रजी

**एकूण प्रश्न : 100**

**वेळ : 1 (एक) तास** **एकूण गुण : 100**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा–क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

परीक्षा–क्रमांक [ ][ ][ ][ ][ ][ ][ ][ ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तर–क्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्न–क्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही. एकापेक्षा जास्त उत्तरे नमूद केल्यास ते उत्तर चुकीचे धरले जाईल व त्या चुकीच्या उत्तराचे गुण वजा केले जातील.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चुकीच्या उत्तराकरीता 25% किंवा 1/4 एवढे गुण एकूण गुणांमधून वजा/कमी करण्यात येतील.''**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम–82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

1. खालीलपैकी विरामचिन्हांचा योग्य वापर केलेली अचूक वाक्ये कोणती ?
   a. ''हो ! जेवल्यानंतर मी सर्व गोष्टी वाचून टाकणार आहे'', जयंत म्हणाला.
   b. वडील म्हणाले, ''रामायण कुणी लिहिले, आहे का तुला ठाऊक ?''
   c. रामायणाचा लेखक हा एक अडाणी 'कोळी' होता.
   (1) फक्त a व c बरोबर, b चूक
   (2) फक्त b व c बरोबर, a चूक
   (3) फक्त a व b बरोबर, c चूक
   (4) फक्त b बरोबर, a व c चूक

2. व्यंजन संधीची उदाहरणे कोणती ?
   a. घरी, हातून, नुमजे
   b. जगदीश, षडानन, वागीश
   c. नयन, गायन, नाविक
   d. तेज:पुंज, रज:कण, अध:पतन
   (1) फक्त a बरोबर
   (2) फक्त b बरोबर
   (3) फक्त a आणि c बरोबर
   (4) फक्त a आणि d बरोबर

3. शुद्धलेखनाच्या नियमानुसार शुद्ध शब्दांचा गट ओळखा.
   a. अनुवंशिक, इंद्रिय, अहिताग्नी, आश्वसित
   b. आनुवंशीक, इंद्रीय, आहिताग्नि, आश्वासित
   c. आनुवंशिक, इंद्रिय, आहिताग्नी, आश्वासित
   d. अनुवांशीक, इंद्रिय, आहीताग्नी, आश्वसीत
   (1) a व c बरोबर
   (2) b व d बरोबर
   (3) फक्त a बरोबर
   (4) फक्त c बरोबर

4. गुरूनानक म्हणाले दुलीचंद ही सुई आपल्या जवळ जपून ठेव मी मरण पावल्यानंतर ती मला परत दे. योग्य विरामचिन्हांचा वापर करा.
   (1) ''गुरूनानक म्हणाले'', दुलीचंद ही सुई आपल्या जवळ जपून ठेव. मी मरण पावल्यानंतर ती मला परत दे.
   (2) गुरूनानक म्हणाले, ''दुलीचंद, ही सुई आपल्या जवळ जपून ठेव. मी मरण पावल्यानंतर ती मला परत दे.''
   (3) गुरूनानक म्हणाले ''दुलीचंद ही सुई आपल्या जवळ जपून ठेव मी मरण पावल्यानंतर ती मला परत दे.''
   (4) गुरूनानक म्हणाले दुलीचंद, ''ही सुई आपल्या जवळ जपून ठेव मी मरण पावल्यानंतर ती मला परत दे.''

5. अपूर्णविरामाच्या संदर्भात पुढील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा.

a. वाक्याच्या शेवटी तपशील द्यावयाचा असल्यास वापरतात.

b. (;) हे अपूर्णविरामाचे चिन्ह आहे.

c. (:) हे अपूर्णविरामाचे चिन्ह आहे.

d. दोन छोटी वाक्ये उभयान्वयी अव्ययांनी जोडलेली असल्यास वापरतात.

(1) b व d बरोबर, a व c चूक

(2) a व c बरोबर, b व d चूक

(3) a व b बरोबर, c व d चूक

(4) c व d बरोबर, a व b चूक

---

6. कर्मणी प्रयोगाच्या संदर्भात पुढील विधाने वाचा व अचूक विधानाचे पर्याय निवडा.

a. कर्मणी प्रयोगात कर्म प्रथमान्त असते.

b. कर्मणी प्रयोगात कर्ता प्रथमान्त कधीच नसतो.

c. तिने गाणे म्हटले हे कर्मणी प्रयोगाचे उदाहरण आहे.

(1) a व c बरोबर, b चूक

(2) b व c बरोबर, a चूक

(3) a, b व c बरोबर

(4) a व b बरोबर, c चूक

---

7. 'येथे अंधार आहे. पुढचे मला काही दिसत नाही'. वाक्य संश्लेषण करून लिहिलेले योग्य पर्याय ओळखा.

a. येथे अंधारात पुढचे दिसत नाही.

b. येथे अंधारामुळे काहीच दिसत नाही.

c. येथे अंधारामुळे मला पुढचे काही दिसत नाही.

d. येथे अंधारामुळे पुढचे काहीच दिसत नाही.

(1) फक्त a व c बरोबर, b व d चूक

(2) फक्त b बरोबर, a, c व d चूक

(3) फक्त c बरोबर, a, b व d चूक

(4) फक्त d बरोबर, a, b व c चूक

---

8. 'तू माझे काम करशील काय ?' या प्रश्नार्थी वाक्याचे आज्ञार्थी रूपांतर ओळखा.

(1) तू माझे काम करावेस.

(2) तू माझे काम कर.

(3) तू माझे काम करशील ?

(4) तू माझे काम करणार.

---

9. तो कोठे न थांबता बोलला. या वाक्याचे होकारार्थी वाक्यात रूपांतर

(1) तो अखंड बोलला.

(2) तो अस्खलित बोलला.

(3) त्याने अस्खलित भाषण केले.

(4) तो न अडखळता बोलला.

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**10.** एक गोष्ट दुसरीवर अवलंबून असते अशा आशयाची वाक्ये जर-तर किंवा जरी-तरी या अव्ययांनी जोडलेली असतात. अशा वाक्यांना ______________ म्हणतात.

(1) आज्ञार्थी (2) प्रश्नार्थी

(3) संकेतार्थी (4) विधानार्थी

---

**11.** खालीलपैकी अचूक विधाने कोणती ?

a. स्वर हे पूर्ण उच्चाराचे वर्ण आहेत.

b. व्यंजने ही अपूर्ण उच्चाराची नसतात.

c. दोन स्वर एकत्र येऊन स्वरादी बनतात.

(1) फक्त a व c बरोबर, b चूक (2) फक्त a बरोबर, b व c चूक

(3) फक्त b व c बरोबर, a चूक (4) फक्त b बरोबर, a व c चूक

---

**12.** विशेषण व त्यांचे उपप्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| a. | अधिविशेषण | i. | गोड, उंच |
| b. | विधिविशेषण | ii. | मोठा, काळा |
| c. | विकारी विशेषण | iii. | हुशार मुलगा |
| d. | अविकारी विशेषण | iv. | नभ निळे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (1) | a – iii | b – iv | c – i | d – ii |
| (2) | a – iii | b – iv | c – ii | d – i |
| (3) | a – iv | b – iii | c – i | d – ii |
| (4) | a – iii | b – i | c – iv | d – ii |

---

**13.** ''लोकांनी सभा उधळली.'' या वाक्यातील शब्दजाती बदलून, क्रियाविशेषण वापरून वाक्य रूपांतर केल्यास ______________ असे विधान तयार होईल. खालील अचूक पर्याय निवडा.

(1) लोक सभा उधळतील.

(2) लोकांनी सभा होऊ दिली नाही.

(3) लोकांनी सभा उधळविली.

(4) लोकांनी सभा उधळून लावली.

---

**14.** खालीलपैकी सामान्य रूपाच्या संदर्भात असलेली अचूक विधाने कोणती ?

a. 'ए' कारान्त पुल्लिंगी नामाचे सामान्य रूप 'वा' कारान्त होते.

b. 'आ' कारान्त स्त्रीलिंगी नामाचे सामान्य रूप 'ए' कारान्त होते.

c. 'ई' कारान्त नपुसकलिंगी नामाचे सामान्य रूप 'या' कारान्त होते.

(1) फक्त a व b बरोबर, c चूक

(2) फक्त b व c बरोबर, a चूक

(3) फक्त b बरोबर, a व c चूक

(4) फक्त c बरोबर, a व b चूक

---

**15.** खालीलपैकी सामान्यनामाचे अचूक गट ओळखा.

a. शाळा, घर, नदी, लेखणी

b. रामा, हरी, आशा, दूध

c. वार्धक्य, कीर्ती, हास्य, नृत्य

(1) फक्त a बरोबर, b व c चूक

(2) फक्त b बरोबर, a व c चूक

(3) फक्त c बरोबर, a व b चूक

(4) a, b व c सर्व बरोबर

---

**16.** खालील समानार्थी शब्दांच्या अचूक जोड्या जुळवा.

a. अही — i. अहन

b. पृथ्वी — ii. पावक

c. दिवस — iii. क्षमा

d. अनल — iv. भुजंग

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | i | iii | iv |
| (2) | iv | iii | i | ii |
| (3) | iii | iv | ii | i |
| (4) | i | ii | iv | iii |

---

**17.** 'त्याच्या डोळ्यात अश्रू आले कारण त्याला पश्चात्ताप झाला' या वाक्यातील वाक्यसंकलन प्रकार ओळखा.

(1) संयुक्तवाक्य

(2) मिश्रवाक्य

(3) केवलवाक्य

(4) गौणवाक्य

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**18.** ''शिकारी लोकांना आपल्या बंदुकीचा भारी अभिमान असतो.'' या वाक्याच्या वाक्य पृथक्करणांच्या जोड्या लावा.

| **वाक्य** | | **वाक्य पृथक्करण** |
|---|---|---|
| अ. | शिकारी लोकांना | i. मूळ विधेय |
| ब. | आपल्या बंदुकीचा भारी | ii. विधेयपूरक |
| क. | अभिमान | iii. मूळ उद्देश |
| ड. | असतो | iv. उद्देश्य-विस्तार |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iv | iii | i |
| (2) | i | ii | iii | iv |
| (3) | ii | iii | iv | i |
| (4) | i | iv | iii | ii |

**19.** समानार्थी वाक्प्रचारांच्या योग्य जोड्या जुळवा.

a. इंगा जिरवणे — i. आहारी जाणे

b. कच्छपी लागणे — ii. सुकाळ होणे

c. गंडांतर येणे — iii. गर्व नाहिसा करणे

d. पेव फुटणे — iv. आभाळ फाटणे

(1) a – iii, b – i, c – iv, d – ii

(2) a – iii, b – iv, c – i, d – ii

(3) a – iii, b – i, c – ii, d – iv

(4) a – iv, b – iii, c – ii, d – i

**20.** वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या योग्य जोड्या जुळवा.

a. वाघाचे कातडे पांघरणे — i. नकार देणे

b. वाटाण्याच्या अक्षता देणे — ii. ढोंग करणे

c. तोंडात तीळ न भिजणे — iii. वगळणे

d. धुऱ्यावर ठेवणे — iv. कोणती तरी गुप्त गोष्ट प्रकट करणे

(1) a – ii, b – i, c – iv, d – iii

(2) a – ii, b – iv, c – i, d – iii

(3) a – iv, b – iii, c – ii, d – i

(4) a – iii, b – i, c – iv, d – ii

**21.** a. सुप्रसिद्ध – चांगले असे प्रसिद्ध – कर्मधारय समास

b. भोजनभाऊ – भोजनापुरता भाऊ – मध्यमपदलोपी समास

c. पंचपाळे – पाच पाळ्यांचा समुह – अलुक् समास

वरील शब्दांचे समास व विग्रह अचूक असलेले पर्याय कोणते ?

(1) फक्त a बरोबर, b व c चूक (2) फक्त b व c बरोबर, a चूक

(3) फक्त a व c बरोबर, b चूक (4) फक्त a व b बरोबर, c चूक

---

**22.** योग्य जोड्या जुळवा.

a. केवल वाक्य — i. एक प्रधान वाक्य व एक किंवा अधिक गौण वाक्ये असतात.

b. मिश्र वाक्य — ii. दोन्ही वाक्ये मिश्र असतात.

c. संयुक्त वाक्य — iii. दोन किंवा अधिक समान वाक्ये प्रधानत्वबोधक उभयान्वयी अव्ययांनी जोडली असतात.

d. मिश्र संयुक्त वाक्य — iv. एकच उद्देश्य व एकच विधेय असते.

| | **a** | **b** | **c** | **d** |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | iv | i | iii |
| (2) | iv | i | iii | ii |
| (3) | iii | ii | iv | i |
| (4) | i | iv | ii | iii |

---

**23.** 'माझ्या नणंदेच्या सासूने तिला उभ्या वर्षात एकदाही माहेरी पाठविली नाही.' या वाक्यातील विधेय-विस्तार काय आहे ?

(1) पाठविली नाही (2) माझ्या नणंदेच्या

(3) सासूने तिला (4) उभ्या वर्षात एकदाही माहेरी

---

**24.** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे अचूक लिंग असलेला पर्याय ओळखा.

a. आज जेवणात <u>साखरभात</u> केला होता. (स्त्रीलिंगी)

b. त्याने <u>देवघर</u> स्वच्छ केले. (नपुसकलिंगी)

c. ताटात <u>मीठभाकर</u> वाढली आहे. (पुल्लिंगी)

(1) फक्त a व b बरोबर, c चूक (2) फक्त b बरोबर, a व c चूक

(3) फक्त c बरोबर, a व b चूक (4) फक्त b व c बरोबर, a चूक

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

25. खालीलपैकी अंत:स्थ व्यंजनांचा गट ओळखा.

(1) च्, ङ्, ज्, म्
(2) य्, र्, ल्, व्
(3) श्, ष्, स्, ह्
(4) ग्, घ्, ङ्, ज्

---

खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्न क्र. **26** ते **30** या प्रश्नांची उत्तरे द्या.

आपला देश हा ग्रामप्रधान देश आहे. कारण आपल्या देशातील खेड्यांची संख्या शहरांपेक्षा कितीतरी पटीने जास्त आहे. त्यामुळे खेड्यांत राहणारे लोक आपल्या देशात बहुसंख्य आहेत. खेडे म्हटले, की ते अतोनात गैरसोयींनी भरलेले, पाणी नाही, दूध नाही, चांगले रस्ते नाहीत, शिक्षण नाही, शेतात पिकवावे ते वर्षभर पुरणारे नाही. या सर्व गैरसोयींमुळे खेड्यांतील जनता पोट भरण्यासाठी शहरांकडे धावू लागली. शहरे अधिकाधिक गजबजू लागली. खेडी ओस पडू लागली. त्यामुळे खेडी मागासलेलीच राहिली. 'खेड्यांचा विकास करा, उद्धार करा', असे सर्व पुढारी भाषणांतून सांगू लागले. पण प्रत्यक्षात कोणी खेड्यांत जायला तयार होईना. कोण जाणार स्वत: होऊन त्या वैराण वाळवंटात ? डॉक्टर काय, व्यापारी काय, शिक्षक काय, कुणीच खेड्यात जायला तयार नाही, अशी स्थिती झाली. सगळ्यांना शहर हवे. त्यामुळे शहरांचा फक्त विकास होऊ लागला. पण शहरांच्या विकासाला पायाभूत असलेली खेडी मात्र मागासलेलीच राहिली.

जोपर्यंत आपण खेड्यांकडे दुर्लक्ष करीत आहोत, तोपर्यंत आपण देशाचा सर्वांगीण विकास करू शकणार नाही, हे महात्मा गांधींनी जाणले आणि 'खेड्यांत चला' असे आवाहन त्यांनी जनतेला केले. खेड्यांतील जनतेची वर्षातील सतत सात-आठ महिने बेकार परिस्थिती पाहून त्यांनी सूतकताईसारखा मूलोद्योग त्यांना दिला. विविध प्रकारचे लघुउद्योग सुचविले. कारण त्यांना माहीत होते की, आपल्या देशात पांढऱ्या कॉलरच्या नागरिकांची संख्या वाढली आहे आणि ते खेड्यांपासून दूर राहू पाहतात. ग्रामोद्धार म्हणजे देशोद्धार हे मर्म गांधीजींनी बरोबर जाणले होते. खेड्यांत जास्तीत जास्त लोकांनी राहिले पाहिजे; उद्योगधंदे वाढले पाहिजेत; शिक्षणाचा प्रसार झाला पाहिजे, अशी गांधीजींची दृष्टी होती. शिक्षणाच्या अभावाने खेड्यांतील जनता निरक्षर नव्हे, तर असंस्कृतही बनण्याचा धोका असतो. त्यांतून गुंड निर्माण होतात आणि ते सबंध देशाच्या प्रगतीत खीळ उत्पन्न करतात.

स्वातंत्र्योत्तर काळात ही गोष्ट राज्यकर्त्यांनी बरोबर ध्यानात ठेवली. कारण हे राज्यकर्ते बहुजन समाजातून, खेड्यापाड्यांतून आलेले होते. ग्रामोद्धारासाठी त्यांनी कंबरा कसल्या. पंचायतराज्य निर्माण करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले आणि सत्ता थेट खेड्यांतील अडाणी माणसापर्यंत पोचविली. खेड्यांतील अज्ञानी लोकांना विविध बाबतींत सल्ला देण्यासाठी खेडोपाडी ग्रामसेवक नेमले. शेतकऱ्यांना शेतीसाठी तगाई, पंप सेट्स्, म्हशींसाठी तगाई, खते, बी-बियाणे वगैरे हरतऱ्हेने मदत देऊन विकासदृष्ट्या अपंग राहिलेल्या खेड्यांना विकसित करण्याचा जोरदार प्रयत्न शासनाने चालविला आहे.

खेड्यांच्या इतर विकासाकडेही राज्यकर्त्यांनी बारकाईने लक्ष पुरविले आहे. आज बहुसंख्य खेड्यांमध्ये वीज पोचून खेडी उजळून निघाली आहेत. खेडोपाडी शाळा झाल्या आहेत. लोक हळूहळू साक्षर होत आहेत. जवळजवळ सर्व खेड्यांत आता चांगले रस्ते तयार झाले आहेत. एस.टी.च्या गाड्या खेड्याखेड्यांत जाऊ लागल्या आहेत. त्यामुळे खेड्यांचा व शहरांचा संबंध अधिकाधिक जुळत आहे. पाण्याची टंचाई असलेल्या खेड्यांत नलिका–विहिरींसारख्या सोयी करण्यात आल्या आहेत. चालू घडामोडींची माहिती खेड्यातील सर्व जनतेला रोजच्या रोज व्हावी, यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीला रेडिओ देण्याची सोय केलेली आहे.

एकूण खेड्यांच्या विकासातूनच संपूर्ण देशाचा विकास साधेल, ही गोष्ट ध्यानात घेऊन ग्रामोद्धाराची मोहीम जोरदारपणे आपल्या देशात सुरू झाली आहे. अर्थात यात अडचणी खूप आहेत. पण अडचणींशी सामना देऊनच त्यांतून वाट काढली पाहिजे. ग्रामोद्धार हे स्वतंत्र देशातील प्रत्येक नागरिकाचे जीवित ध्येय असले पाहिजे. प्रत्येकाने त्यासाठी झटले पाहिजे. कारण ग्रामोद्धारासाठी झटणे म्हणजेच देशोद्धारासाठी झटणे.

---

**26.** खेड्याच्या मागासलेपणाची खालीलपैकी कोणती लक्षणे उताऱ्यात सांगितली आहेत ?

a. खेड्यातील वाढती लोकसंख्या

b. खेड्यातील वाढती महागाई व बेरोजगारी

c. पोट भरण्यासाठी शहराकडे धाव

d. शहराच्या विकासात भर

(1) फक्त a व b बरोबर

(2) फक्त a, c व d बरोबर, b चूक

(3) फक्त b बरोबर, a, c, d चूक

(4) वरील सर्व बरोबर

---

**27.** देशाच्या सर्वांगीण विकासासाठी कोणत्या उपाययोजना सूचविल्या आहेत ?

a. खेड्याकडे चला

b. मूल उद्योग व गृह उद्योग

c. सरकारी नोकरी

d. शिक्षणाचा प्रचार व प्रसार

(1) फक्त a, b व d बरोबर, c चूक

(2) फक्त b व c बरोबर, d चूक

(3) फक्त a, c व d बरोबर, b चूक

(4) वरील सर्व बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**28.** ग्रामोद्धार का व्हावा असे लेखकास वाटते ?

(1) सुसंस्कृत भारत घडावा

(2) खेड्यातून नेतृत्व निर्माण व्हावे

(3) खेड्यातून शहरात जाण्याचा ओघ थांबावा

(4) ग्रामीण संस्कृतीचा पाया मजबूत व्हावा

---

**29.** ग्रामोद्धारासाठी कोणती मोहीम उभारली जात आहे ?

a. पंचायतराज व्यवस्था निर्माण करून सत्तेचे विकेंद्रीकरण केले आहे.

b. शेतकरी, शेतमजुर वर्ग विकासासाठी स्वत:हून पुढाकार घेत आहे.

c. शासनाकडून खेडे विकसित करण्यासाठी विविध उपाययोजना होत आहे.

d. शैक्षणिक व तंत्रज्ञान विषयक सुविधा पुरविल्या आहेत.

(1) फक्त a, b व d बरोबर c चूक

(2) फक्त a, c व d बरोबर b चूक

(3) फक्त a, b व c बरोबर d चूक

(4) वरील सर्व बरोबर

---

**30.** उताऱ्याला योग्य शिर्षक द्या.

(1) शहराकडे चला

(2) ग्रामोउद्दार

(3) मागासलेली खेडी

(4) शिक्षणाचा अभाव

---

**31.** क्रियापदाचे प्रकार व त्यांचे उपयोजन यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. आज्ञार्थी क्रियापद | i. अंगी धैर्य असणाऱ्यांनीच हे कार्य करावे |
| b. विध्यर्थी क्रियापद | ii. मी खात्रीने पास होईन |
| c. स्वार्थी क्रियापद | iii. निमंत्रण आले तर मी येईन |
| d. संकेतार्थी क्रियापद | iv. तेवढी खिडकी लाव पाहू |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | i | iii |
| (2) | iv | i | ii | iii |
| (3) | i | iv | iii | ii |
| (4) | ii | iii | iv | i |

**32.** हां, ठिक, बरे हं – या केवलप्रयोगी अव्ययांचा प्रकार ओळखा.

a. हर्षद्योतक केवलप्रयोगी अव्यये

b. आश्चर्यद्योतक केवलप्रयोगी अव्यये

c. स्वीकारद्योतक केवलप्रयोगी अव्यये

d. मौनद्योतक केवलप्रयोगी अव्यये

(1) फक्त a बरोबर
(2) फक्त b आणि d बरोबर
(3) फक्त c बरोबर
(4) फक्त a आणि c बरोबर

---

**33.** शब्दयोगी अव्यये असणारी वाक्ये कोणती ?

a. तो माडीवर आहे.

b. त्याने हात वर केले.

c. दिव्याखाली अंधार असतो.

(1) फक्त a बरोबर
(2) फक्त b बरोबर
(3) a व c बरोबर
(4) b व c बरोबर

---

**34.** लक्षार्थ असलेली अचूक वाक्यरचना कोणती ?

a. घरावरून राजाची मिरवणूक गेली.

b. भर दरबारात माधवरावांनी गंगोबाच्या श्रीमुखात दिली.

c. पाय टाकुनी जळांत बसला असला औदुंबर.

(1) फक्त a बरोबर, b व c चूक
(2) फक्त b बरोबर, a व c चूक
(3) फक्त a व b बरोबर, c चूक
(4) फक्त c बरोबर, a व b चूक

---

**35.** 'पक्ष' या शब्दासाठी खालीलपैकी कोणता शब्दसमूह समर्पक आहे ?

(1) बाजू, वारा, स्वच्छंद
(2) पंख, पंधरवडा, राजकीय संघटना
(3) पक्षाघात, पक्षी, पक्षांतर
(4) चिमणी, कावळा, पोपट

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

**36.** 'त्याचा धाकटा मुलगा आज क्रिकेटच्या सामन्यात चांगला खेळला.' या वाक्यातील उद्देश-विस्तार ओळखा.

a. त्याचा धाकटा
b. चांगला खेळला
c. क्रिकेटच्या सामन्यात
d. मुलगा

(1) फक्त a बरोबर
(2) फक्त d बरोबर
(3) फक्त a आणि c बरोबर
(4) फक्त a आणि b बरोबर

**37.** 'सुतोवाच करणे' या वाक्प्रचाराच्या विरुद्ध अर्थाचा वाक्प्रचार कोणता ?

a. इतिश्री होणे
b. मूठमाती देणे
c. तडीस जाणे

(1) फक्त a बरोबर, b व c चूक
(2) फक्त a व b बरोबर, c चूक
(3) फक्त c बरोबर, a व b चूक
(4) a, b व c बरोबर

**38.** खालील विशेषणांची वैशिष्ट्ये अचूक ओळखा.

a. नामाबद्दल अधिक माहिती सांगते.
b. नामाची व्याप्ती अमर्याद करते.
c. ते साधारणपणे नामानंतर येते.

(1) फक्त a बरोबर, b व c चूक
(2) फक्त a व c बरोबर, b चूक
(3) फक्त b व c बरोबर, a चूक
(4) फक्त b बरोबर, a व c चूक

**39.** एका माणसाने नीच कर्म केले. त्याबद्दल येणारे संकट तो सहन करील पण केल्या कर्माबद्दल त्याची घुसमट होईल. या प्रसंगानुरूप असलेल्या म्हणीचा अचूक पर्याय ओळखा.

a. चोराला चावला विंचू चोर करीना हूं की चूं
b. जीव टांगणीला लागणे
c. चोराच्या मनात चांदणे

(1) फक्त a बरोबर, b व c चूक
(2) फक्त a व c बरोबर, b चूक
(3) फक्त c बरोबर, a व b चूक
(4) फक्त b बरोबर, a व c चूक

**40.** संधीची अचूक उदाहरणे असलेले पर्याय कोणते ?

a. इ + अ = य
b. ऋ + अ = र
c. उ + अ = व

(1) फक्त a बरोबर, b व c चूक
(2) फक्त a व c बरोबर, b चूक
(3) फक्त b व c बरोबर, a चूक
(4) a, b व c बरोबर

**41.** समानार्थी शब्दांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. कुरग | I. अवनी |
| b. खग | II. वारू |
| c. तुरग | III. विहंग |
| d. मही | IV. हरीण |

अचूक पर्याय कोणता ?

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | IV | III | II | I |
| (2) | II | IV | I | III |
| (3) | III | I | II | IV |
| (4) | I | III | IV | II |

**42.** विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. छचोर | i. दानशूर |
| b. दर्प | ii. संयमपूर्ण |
| c. कवडीचुंबक | iii. सदाचारी |
| d. निरर्गल | iv. लीनता |

(1) a – iii b – i c – ii d – iv
(2) a – iv b – i c – ii d – iii
(3) a – iii b – iv c – i d – ii
(4) a – ii b – iii c – i d – iv

**43.** योग्य जोड्या जुळवा.

| | |
|---|---|
| a. तत्सम | I. झाड, डोळा, घोडा |
| b. तद्भव | II. झुरळ, उसळ, केळवण |
| c. देशी | III. कोवळा, सासू, घास |
| d. कानडी | IV. उत्सव, सत्कार, नदी |

(1) a – IV, b – III, c – I, d – II
(2) a – IV, b – I, c – II, d – III
(3) a – II, b – IV, c – III, d – I
(4) a – IV, b – II, c – III, d – I

**44.** देशी शब्दांचा गट असलेला अचूक पर्याय ओळखा.

a. खेटर, चटणी, गिल्ला

b. डागिना, थोबाड, कल्ला

c. हवेली, रूखवत, नवस

d. कालव, डोके, बडबड

(1) फक्त b व c बरोबर, a व d चूक

(2) फक्त a व c बरोबर, b व d चूक

(3) फक्त b व d बरोबर, a व c चूक

(4) फक्त d बरोबर, a, b व c चूक

---

**45.** योग्य विधाने ओळखा.

a. संस्कृतमधून जशास तसे आलेल्या शब्दांना तत्सम शब्द म्हणतात.

b. परभाषेतून आलेल्या शब्दांत नंतर कोणतेही बदल होत नाहीत.

c. संस्कृत शब्दांपासून बनलेल्या मराठी शब्दांना तद्भव शब्द म्हणतात.

(1) a व c बरोबर

(2) a व b बरोबर

(3) फक्त c चूक

(4) फक्त b व c बरोबर

---

**46.** उद्गारातील भाव सौम्य असतो तेव्हा केवलप्रयोगी अव्ययानंतर कोणते विरामचिन्ह येते ?

(1) स्वल्पविराम

(2) अर्धविराम

(3) उद्गारवाचक चिन्ह

(4) अपसारणचिन्ह

---

**47.** मूळ नामाशी जन्मत:च संबद्ध असलेला विकार

a. लिंगविकार

b. वचनविकार

c. विभक्तीविकार

अचूक पर्याय कोणता ?

(1) फक्त a व b बरोबर, c चूक

(2) फक्त a बरोबर, b व c चूक

(3) फक्त b बरोबर, a व c चूक

(4) फक्त c बरोबर, a व b चूक

---

**48.** 'घनश्याम' हा शब्द मध्यम पदलोपी समासाच्या कोणत्या उपप्रकारांचे उदाहरण आहे ?

(1) उपमानपूर्वपद

(2) उपमानोत्तरपद

(3) अवधारणापूर्वपद

(4) अवधारणोत्तरपद

---

**49.** योग्य जोड्या लावा.

a. उपसर्गघटित — i. पुजारी

b. प्रत्ययघटित — ii. तेलकट

c. शब्दसाधिते — iii. गोडधोड

d. अभ्यस्तशब्द — iv. अभिनंदन

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | iv | ii | i | iii |
| (2) | i | iii | iv | ii |
| (3) | ii | iv | i | iii |
| (4) | iv | i | ii | iii |

---

**50.** खालील वैशिष्ट्यांवरून प्रयोग ओळखा.

a. अप्राणीवाचक शब्द कर्मस्थानी असता तो नेहमी प्रथमान्त असतो.

b. जेव्हा वाक्यात संप्रदानार्थी चतुर्थी असते तेव्हा कर्म नेहमी प्रथमान्त असते.

c. पुरुषवाचक सर्वनामे कर्मस्थानी असता ती नेहमी चतुर्थ्यन्तच असतात.

(1) कर्तरी प्रयोग (2) कर्मणी प्रयोग

(3) भावे प्रयोग (4) संकर प्रयोग

---

**51.** Identify the type of clauses underlined in the following sentences.

1. Whoever thought of that idea is a genius.
2. I asked her when she would finish writing the book.

(1) Adverb clause, Noun clause (2) Adjective clause, Adverb clause

(3) Noun clause, Noun clause (4) Adverb clause, Adverb clause

---

**52.** Identify the function of modal auxiliary 'could' in the given sentences.

a. You could take the four of the castle tomorrow.

b. This new drug could be an important step in the fight against cancer.

(1) Express possibility, request

(2) Express obligation, permission

(3) Express suggestion, possibility

(4) Express politeness, request

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

53. Identify the sentence/s punctuated correctly.

a. Friends, companions, relatives – all deserted him.

b. He asked me whether I had written my exercise.

c. O father I hear the sound of guns.

d. O Hamlet, speak no more !

(1) a, b, d
(2) a, b, c, d
(3) a, c, d
(4) only c

54. Match the affixes with the words :

| | A | | B |
|---|---|---|---|
| i. | de __ | a. | cure |
| ii. | __ age | b. | man |
| iii. | __ en | c. | duke |
| iv. | arch __ | d. | throne |
| v. | in __ able | e. | bond |
| vi. | __ hood | f. | length |

| | i | ii | iii | iv | v | vi |
|---|---|---|---|---|---|---|
| (1) | d | e | f | c | a | b |
| (2) | a | b | f | d | e | c |
| (3) | e | b | c | d | a | f |
| (4) | d | f | e | a | c | b |

55. Identify the type of phrase underlined in the following sentence.

He got the first division <u>by virtue of hard work</u>.

(1) Noun phrase
(2) Adjective phrase
(3) Adverb phrase
(4) Prepositional phrase

56. The ship has its <u>complement</u> of 150 passengers.
The underlined word in the above sentence means

(1) Support
(2) Full amount
(3) Supplement
(4) Best wishes

57. Match the following pairs :

| A | | B |
|---|---|---|
| i. | Compatriot | a. One who leaves a country to live in another |
| ii. | Emigrant | b. One who comes to the aid of others |
| iii. | Immigrant | c. A foreigner who comes to stay in a country |
| iv. | Samaritan | d. A colleague belonging to the same country |

(1) i – c, ii – d, iii – b, iv – a
(2) i – d, ii – a, iii – c, iv – b
(3) i – b, ii – c, iii – a, iv – d
(4) i – a, ii – b, iii – d, iv – c

---

58. Identify correct word for the phrase – 'A person who lives for pleasure'.

(1) Hedonist
(2) Fanatic
(3) Homicide
(4) Pacifist

---

59. Select the correct meaning of the underlined phrase in the given sentence.
Do you understand what the poet is <u>getting at</u> in these lines ?

(1) Overcome
(2) Finish
(3) Suggest
(4) Recover

---

60. Identify the part of speech of the underlined words in the given sentences.

I. Soft drinks have a high sugar <u>content</u>.
II. I was <u>content</u> just to stay at home and read.
III. He was planning to <u>desert</u> his family and go abroad.
IV. It hasn't rained in the <u>desert</u> for years.

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | Noun | Adjective | Verb | Noun |
| (2) | Noun | Verb | Verb | Noun |
| (3) | Adjective | Adverb | Noun | Verb |
| (4) | Adverb | Adjective | Noun | Noun |

---

61. Identify the examples which are not of Adverb clauses of time from the given sentences.

a. After the law had been passed this form of crime ceased.
b. Let him be arrested wherever he may be found.
c. We eat so that we may live.
d. If it rains, we shall stay at home.

(1) a, b, c only (2) b, c, d only
(3) a, c, d only (4) a, b, d only

---

62. Identify the correct word for the explanation.
"Complete range of different opinions"

(1) Spectrum (2) Speculate
(3) Splendid (4) Spectacular

---

63. Fill in the blanks :
A new born infant's ________ skills are not fully ________, for it can not discern images more than 10 inches away.

(1) olfactory, shared (2) descriptive, ripened
(3) visual, developed (4) average, familiar

---

64. Identify the sentence/s with correct tense form.

a. I have not seen him for several days.
b. When I first met him, he was studying painting.
c. He fell ill and is on leave today.
d. We wait for you as long as you wish.

(1) Only a and b
(2) Only b and c
(3) Only a and d
(4) Only c and d

---

**65.** Identify the correct sentence/s.

a. He seldom or never drinks.

b. He walked more and more quickly than I expected.

c. I never remember having told you so.

d. He was too 'happy to see me'.

(1) Only a and b (2) Only c and d

(3) Only a, b and d (4) Only a, c and d

**66.** Fill in the blanks with appropriate words.

I. litter II. litre III. patrol IV. petrol

a. About 2% of fast-food packaging ends up as ________.

b. I'm a bit low on _______.

c. Guards _________ the area at night.

d. The tax increase will add 4p to a _________ of petrol.

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | III | II |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | IV | I | III | II |
| (4) | III | IV | II | I |

**67.** Identify the grammatically incorrect sentence/s.

a. I saw a good film yesterday.

b. The train left before I arrived.

c. If I had a car, things would be fine.

d. He read the Bible everyday.

(1) Only a and c

(2) Only b and c

(3) Only b and d

(4) Only d

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**68.** Change the degree of comparison of the following sentence :

'Shakuntal is the best drama in Sanskrit'.

a. Very few dramas are as good as Shakuntal in Sanskrit.

b. No other drama in Sanskrit are as good as Shakuntal is.

c. Shakuntal is better than any other drama in Sanskrit.

d. Shakuntal is better than many other dramas in Sanskrit.

(1) a and b (2) b and c

(3) only c (4) only d

---

**69.** Choose the correct indirect speech sentence from the following sentences :

The magician said to the boy, "make haste and give me the lamp."

(1) The magician told the boy to make haste and gave me the lamp.

(2) The magician commanded the boy to make haste and to give him the lamp.

(3) The magician urged the boy to make haste and gave him the lamp.

(4) The magician to the boy making haste and giving me the lamp.

---

**70.** Identify the underlined phrase in the following sentences.

1. The dewdrops glitter in the sunshine.
2. No man can serve two masters.
3. I shoot an arrow into the air.

(VP = Verb Phrase, NP = Noun Phrase, PP = Prepositional Phrase, AjP = Adjective Phrase, Adv = Adverb Phrase)

(1) VP, NP, PP (2) AjP, Adv, PP

(3) VP, AjP, PP (4) VP, PP, NP

---

71. Fill in the blanks to make a meaningful sentences.

a. Dhirubhai Ambani was __________.

b. Bimal Roy was __________ film maker.

c. I was saved from __________ danger.

(1) a magnate, an eminent, an imminent

(2) a magnet, an imminent, an eminent

(3) an eminent, a magnate, an imminent

(4) an eminent, an imminent, a magnet

---

72. The story centres on the tempestuous relationship between a father and his three daughters.

Select the correct antonym for the underlined.

(1) Lively (2) Exciting

(3) Frenzied (4) Placid

---

73. Match the pairs :

| I | II |
|---|---|
| a. Deterioration | i. Remarks done to harm somebody's reputation |
| b. Hypocrisy | ii. Having an evil reputation |
| c. Notorious | iii. Process of going worse |
| d. Defamation | iv. Concealment of true belief |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | ii | i | iv | iii |
| (2) | iii | iv | i | ii |
| (3) | iii | iv | ii | i |
| (4) | iv | i | iii | ii |

---

74. He was the most __________ composer of his time. (Invent)

Use the correct adjective form of the word given in the bracket.

(1) Inventor (2) Invention

(3) Invent (4) Inventive

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

**75.** Identify the correct sentence/s.

a. He was confident as well as hopeful.

b. Work hard lest you should fail.

c. We will try and find him.

d. I handed him my valuables because I might loose them.

(1) Only a and b (2) Only b and c

(3) Only a (4) Only c and d

---

**76.** Choose the correct idiom for the underlined words in the sentence :

He has a very bad habit of talking irrelevantly.

(1) To burn one's boats

(2) To burn candle at both ends

(3) To bell the cat

(4) To beat about the bush

---

**77.** Identify sentence/s which are not simple sentence/s.

a. His courage won him honour.

b. The moon was bright and we could see our way.

c. They rested when evening came.

d. They would not allow them to fight.

(1) a, b, d (2) a, c

(3) only a (4) b, c, d

---

**78.** Identify the part of sentence which contains an error.

The Nile is one of the few major river in the world flowing south to north.

(1) The Nile is

(2) One of the few major river in the world

(3) Flowing south to north

(4) No error

---

**79.** Choose the correct meaning for the underlined :

i) Mathematics is my Achille's heel.

ii) He had been fiddling the accounts for years.

(1) strong point, giving importance

(2) crucial point, touching

(3) weak point, changing dishonestly

(4) moot point, cheating

---

**80.** Identify the correct meaning for the underlined.

1) There was bad blood between Shylock and Antonio.

2) Many Indians took a leaf out of Gandhi's book and made great sacrifices.

3) Portia turned the tables on Shylock.

(1) hatred, copied, ignored

(2) rivalry, tore, changed

(3) fight, follow, moved

(4) ill feeling, imitated, reversed the position

---

**81.** Identify the auxiliary verbs and lexical verbs in the given sentences.

I. Be there at 8 o'clock.

II. I have had my breakfast.

III. Do come in.

IV. Are you doing computer science at college ?

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | be-lexical | have-auxiliary<br>had-lexical | do-auxiliary<br>come-lexical | are-auxiliary<br>doing-lexical |
| (2) | be-auxiliary | have-auxiliary<br>had-auxiliary | do-auxiliary<br>come-lexical | are-lexical<br>doing-lexical |
| (3) | be-lexical | have-lexical<br>had-lexical | do-lexical<br>come-lexical | are-auxiliary<br>doing-lexical |
| (4) | be-lexical | have-lexical<br>had-auxiliary | do-lexical<br>come-auxiliary | are-auxiliary<br>doing-auxiliary |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

82. Identify the correct sentence/s.

a. Either he or you are going to pay the damages.
b. Each of the offenders have to be punished.
c. The whole group of pedestrians was stuck by the speeding vehicle.

(1) Only a and b (2) Only b and c
(3) Only a and c (4) Only c

---

83. He heard the king's remark. He held his breath.
Select the correct simple sentence of the above.

(1) As soon as he heard the king's remark he held his breath
(2) On hearing the king's remark he held his breath
(3) He heard the king's remark and he held his breath
(4) King's remark made him held his breath

---

84. Identify the sentences which contain infinitives.

a. To tell the truth, I quite forgot my promise.
b. I saw him go.
c. A rolling stone gathers no mass.
d. Children love making mud castles.
e. I hope you will excuse my leaving early.

(1) a, c, d (2) b, c, e
(3) a, b, d, e (4) only a and b

---

85. Identify the sentence with subjunctive mood.

a. If she likes this pen, I shall give it to her.
b. Help me if you can.
c. The sentence is that the Prisoner be hanged.
d. God save the Queen.

(1) Only a and b (2) Only b and c
(3) Only b and d (4) Only c and d

---

**86.** What is the meaning of the underlined phrases in the following sentences ?

I. It is unkind to laugh at a person who is in trouble.

II. He procured the contract by greasing the secretary's palm.

III. His unusual surrender shows that he has an axe to grind in this deal.

IV. She gave the story in a nut-shell.

a. be friendly

b. have selfish motive

c. in brief

d. bribe

e. make fun of

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | a | c | d | b |
| (2) | e | d | c | b |
| (3) | b | e | a | d |
| (4) | e | d | b | c |

**87.** Identify the correct sentence/s.

a. The fire spread through the building quickly but everybody could escape.

b. The phone is ringing. It can be Tim.

c. What do I have to do to get a driving licence ?

(1) Only a (2) Only b

(3) Only c (4) Only a and b

**88.** Find out the correct synonym for 'Vintage', 'Sacrosant'.

(1) classic, sacred (2) alcoholic, decent

(3) disease, unholy (4) spoiled, modern

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**89.** Find the correct antonym for 'Ostentatious'.

(1) not resonant (2) pompous

(3) loud (4) not eager

**90.** Identify the kind of verb in the given sentence.

'We can lift this load'.

(1) transitive verb, modal verb

(2) intransitive verb, modal verb

(3) modal verb, transitive verb

(4) transitive verb, transitive verb

Read the following passage and answer the questions given below (Q.No. **91** to **95**).

Conversation is a fine art. It is the art of exchanging thoughts. It is an art which even the least gifted of us can *cultivate*. Not everybody can paint or play music, but almost everyone can talk. Conversation, therefore, is that art which affords the greatest pleasure to the greatest number. "To talk", says R.L. Stevenson, "is our chief business in the world : and talk is by far the most *accessible* of pleasures. It costs nothing in money; it is all profit; it completes our education, founds and *fosters* our friendships, and can be enjoyed at any age and in almost every state of health."

Conversation is indeed the most easily teachable of all the arts. All you need to do in order to become a good conversationalist is to find a subject that interests you and your listeners. There are, for example, numberless hobbies to talk about. But the important thing is that you must talk about the other fellow's hobby rather than your own. Therein lies the secret of your popularity. Talk to your friends about the things that interest them, and you will get a *reputation* for good fellowship, *charming* wit, and a brilliant mind. There is nothing that pleases people so much as your interest in their interests.

It is just as important to know what subjects to avoid as what subjects to select for good conversation. If you don't want *to be set down* as *a wet blanket* or a bore, be careful to avoid certain unpleasant topics. Avoid talking about yourself, unless you are asked to do so. People are interested in their own problems, not in yours. Sickness or death bore everybody. The only one who willingly listens to such talk is the doctor, but he gets paid for it.

To be a good conversationalist, you must know not only what to say, but how to say it. Be civil and *modest*. Don't over-emphasize your own importance. Make others feel that you are aware of their worth and importance. Be mentally quick and witty. But don't hurt others with your wit. Finally, try to avoid *mannerism* in your conversation. Don't bite your lips, or click your tongue, or roll your eyes, or use your hands *excessively* as you speak. Don't be like that Frenchman who said, "How can I talk if you hold my hands ?"

---

**91.** According to the passage which art affords the greatest pleasure ?

a. Painting
b. Music
c. Conversation
d. Music and Conversation

(1) only b
(2) only c
(3) c and d
(4) a and c

---

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

**92.** What are the important features of the art of conversation ?

a. It is available to all

b. It is free

c. It does not provide pleasure

d. It can be easily taught

e. It is not a fine art

(1) a, b, c (2) a, b, d

(3) c, d, e (4) a, d, e

---

**93.** Which of the statements are correct in the context of the passage ?

a. An art of conversation is a god given gift

b. An art of conversation does not provide pleasure

c. Anybody can learn art of conversation at any age

d. A good conversationalist is always witty and has presence of mind

e. When you are in conversation, always talk about yourself

(1) a and b (2) c and d

(3) d and e (4) c and e

---

**94.** Identify correct meaning of the idiom 'a wet blanket'.

(1) damp blanket (2) killjoy

(3) useless efforts (4) celebrant

---

**95.** What is the meaning of founds and fosters ?

(1) establish and develop

(2) melt and mould

(3) concretize, support

(4) build a structure, cultivate

---

**96.** Identify the incorrect sentence/s.

a. His trouser is torn.

b. The gentry of the town were invited.

c. His hairs are all black.

d. Ten thousand dollar is a big sum.

(1) Only a and d

(2) Only a, b and c

(3) Only b and d

(4) Only a and c

**97.** Identify the conditions expressed in the following sentences.

a. Likely

b. Unlikely

c. Almost impossible

d. Hypothetical

e. Unreal

I. If they made me the principal of the school, I would change many things.

II. If I went to London, I would seek an audience with the Queen.

III. If he worked hard, he would pass.

IV. If he had invited me, I would have gone.

| | I | II | III | IV |
|---|---|---|---|---|
| (1) | e | a | c | d |
| (2) | d | c | b | e |
| (3) | d | a | b | c |
| (4) | a | b | c | d |

98. Identify the sentence/s in the correct passive voice.

a. Have you been shown the new machine ?
b. He hates people keeping him waiting.
c. He was a mystery man, very little was known about him.

(1) Only a (2) Only b
(3) Only c (4) Only a and c

99. Identify the sentences with correct question tag.

a. Place this apple on his head, don't you ?
b. Let's start, shall we ?
c. There was no answer, was there ?
d. Let me study, won't you ?

(1) Only a and b (2) Only b and c
(3) Only a and c (4) Only b and d

100. Select the sentences with correct question tag.

a. A woman buys a purse, doesn't she ?
b. Nowhere it is possible, is it ?
c. He never smokes, doesn't he ?
d. We shall return soon, shan't we ?

(1) Only a and b (2) Only c and d
(3) Only a, b and c (4) Only a, b and d

**सूचना – (पृष्ठ 1 वरून पुढे.....)**

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

**प्र. क्र. 201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या व्याक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

SEAL

**प्र. क्र. 201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्न-क्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**